I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 216-220
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/000016?
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतातील ग्रामीण व नागरी स्थानिक शासन संस्था

प्रिया वि. सोनटक्के
राज्यशास्त्र विभाग डॉ. खत्री महाविदयालय, तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author :- sontakkepriya961@gmail.com

Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023

**सारांश :**
भारतातील लहान—लहान आकाराची खेडी आणि नगर व महानगरांमधील स्थानिक स्वशासनाची संरचना वेगवेगळी असणे स्वाभाविक आहे. भारतातच नव्हे तर जगातल्या अनेक देशांमध्ये स्थानिक स्वशासनाला प्रदीर्घ असा इतिहास लाभला आहे. भारतातील खेडयांमध्ये ग्रामपंचायतीचे अस्तित्व वैदिक काळापासून आहे. वेदांमध्ये ग्रामसभा रामायणात जनपदसंघ, महाभारतात ग्रामसभा व तेथील प्रमुखास श्ग्रामणीश म्हणत असल्याचा उल्लेख आढळतो.

भारत हे संघराज्य आहे. भारतीय संघराज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजित आहे. भौगोलिक आकार आणि एकूण लोकसंख्या याबाबत घटकराज्यांमध्ये विविधता आहे. भारतीय संघराज्यात मणिपूर, त्रिपुरा, गोवा, सिक्कीम यासारखी लहान आकाराची घटकराज्ये आहेत. तर दुसरीकडे उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, राजस्थान यासारखी मोठी घटकराज्ये देखील आहे. भारतात पंचायतराज योजनेची निर्मिती ही बलवंतराय मेहता समितीने केली. पंचायतराजचे गठण तीन स्तरावर असावे. खेडयासाठी ग्रामपंचयात, विकास गट किंवा तालुका पातळीवर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद अशी तीन स्तरीय रचना निर्माण करण्याची शिफारस या समितीने केली.
**मुख्यशब्द :** ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, स्थानिक शासन संस्था, नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका.

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकातील विभिन्न राष्ट्र राज्ये ही लहान—मोठया आकाराची आहेत. तरीही भौगोलिक दृष्टया राज्याचा आकार आणि राज्याची एकूण लोकसंख्या या दोन्ही दृष्टीने जगामधील जवळपास सर्व राष्ट्र राज्ये ही मोठया आकाराची आहेत. असे म्हणता येईल. एखादया विशिष्ट गावातील समुदायाच्या कल्याणासाठी विविध सेवा—सुविधांचे संचालन करण्याच्या शासनपध्दतीला किंवा शासनव्यवस्थेला स्थानिक स्वशासन असे म्हाणात.

आपल्या देशात तीन पातळयांवरून राज्यकारभार चालतो संपूर्ण देशाचा राज्याकारभार संघशासन चालवते संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व चलन इत्यादी विषय संघशासनाच्या कक्षेत येतात. दुस—या पातळीवर राज्यशासन असते. महाराष्ट्राचे राज्यशासन कायदा, सुव्यवस्था, आरोग्य शिक्षण यांच्यासंबंधी कायदे करते. तिस—या पातळीवार स्थानिक शासन संस्था असतात. भारतीय संविधानातील अनुच्छेद ४० मध्ये श्ग्रामपंचायती स्थापन करून स्वशासनाची समर्थ केंद्रे बनविण्याच्या दिशेने प्रादेशिक स्तरावरील शासनसत्ता पाउले उचलतील श्श अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :—**

१) शहरी व ग्रामीण शासन संस्थेविषयी माहिती प्राप्त हाणे

२) स्थानिक शासन संस्थेचे महत्व अधोरेखित करणे.

३) स्थानिक शासन संस्थेच्या कार्याची विभागणी जाणून घेणे.

**स्थानिक स्वशासनाची व्याख्या :—**

**१) विल्यम रॉबसन :—**


स्थानिक स्वशासन म्हणजे सार्वभौमसत्तेचा अभाव परंतु स्वप्रशासन नियंत्रणाचा अधिकारी असलेला असा प्रादेशिक समाज, की ज्याला लोकप्रतिनिधींची संघटनात्मक संरचना निर्माण करता येते.

**२) आरे.एम.जॅल्सन :—**

''स्थानिक स्वशासन ही प्रामुख्याने स्थानिक समूहाच्या कल्याणसाठी विभिन्न सेवांचे संचालन करण्याची पध्दती होय.''

**३) एल गोल्डिंग :–**

''स्थानिक शासन म्हणजे स्थानिक लोकांनी त्यांच्याशी संबंधिकत असलेल्या विषयांचे व्यवस्थापन स्वत:च करणे होय.''




**भारतातील ग्रामीण व नागरी स्थानिक स्वशासनाची संरचना**

भारत हे संघराज्य आहे. भारतीय संघराज्य हे घटकराज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजित आहे. भौगोलिक आकार आणि एकुण लोकसंख्या याबाबत घटकराज्यांमध्ये विविधता आहे. उदा. भारतीय संघराज्यात मणिपूर, त्रिपुरा,गोवा,सिक्कीम यासारखी लहाण आकाराची घटकराज्ये आहेत. तर दुसरीकडे उत्तरप्रदेश , मध्यप्रदेश, बिहार, राजस्थान यासारखी मोठी घटकराज्ये देखील आहेत. याशिवाय प्रादेशिक भाषा, सणवार, उत्सव, उदयोगधंदे व व्यवसाय आदींबाबतही विभिन्न घटकराज्यात विविधता आहे. अश स्थितीत संपूर्ण भारतात स्थानिक स्वशासन संस्थांची संरचना सर्वत्र समान व एकसारखी असणे शक्य नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत: १९९२ च्या सुमारास संपूर्ण भारतात ग्रामीण स्वशासन संस्थांची संरचना समान स्वरूपाची असावी या दिशेने मुद्दाम प्रयत्न करण्यात आले.

ग्रामीण स्थानिक स्वशासन

**प्रस्तावना :–**

भारताने स्वातंत्र्योत्तर काळातील विकास कार्यात लोकसहभाग आणि लोकशाी विकेंद्रीकरण या दोहोंचे महत्व योग्य प्रकारे उमजून घेतले. आणि त्याप्रमाणे केलेली कृती केली म्हणजे त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था होय.

भारत हा खेडयांचा देश आहे. पंचायत हा भारतीय खेडयांमधील शासन व्यवस्थेचा कणा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने ग्रामीण समुदायाच्या पुनर्रचनेचा व विकासाचा कार्यक्रम हाती घेतला.

**१)ग्रामपंचायत**

ग्रामपंचायत हा लोकशाही विकेंद्रीकरणातील सर्वात खालचा ग्रामपंचायत ही पंचायतराज व्यवस्थेतील तळपातळीवरील संस्था आहे. ग्रामपंचायत हा ग्रामीण स्वशासनातील अंतीम घटक आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या तुलनेत ग्रामपंचायती हया अधिक प्राचीन आहेत.

**ग्रामपंचायतीची रचना**

ग्रामपंचायतीची एकुण सदस्य संख्या लोकसंख्येच्या आधारावर ठरविण्यात येते. ग्रामपंचायतीत कमीत कमी ७ आणि जास्तीत जास्त १५ सदस्य असतात.

१००० किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या ७ सदस्य

१००० ते २००० लोकसंख्या ९ सदस्य

२००० ते ३००० लोकसंख्या ११ सदस्य

३००० ते ४००० लोकसंख्या ११ सदस्य

४००० पेक्षा जास्त लोकसंख्या १५ सदस्य

**२)पंचायत समिती**

पंचायत समिती हा त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेतील मधला स्तर आहे. पंचायत समितीचे कार्यक्षेत्र जिल्हा परिषदेसारखे मोठे वा विशाल नाही. तसेच ते ग्रामपंचायतीसारखे एखादया विशिष्ट गावापुरतेही मर्यादितही नाही.

**पंचायत समितीची रचना**

पंचायत समितीमध्ये खालीलप्रमाणे चार प्रकारचे सदस्य असू शकतात.

१. प्राथमिक सदस्य

२. सहयोगी सदस्य

३. स्वीकृत सदस्य

४. परसिध्द सदस्य

प्रत्येक घटकराज्यात पंचायत समितीच्या रचनेचा आराखडा हा त्या–त्या घटकराज्याच्या विधिमंडळाद्वारे निश्चित केला जातो. पंचायत समितीत प्रत्यक्ष पध्दतीने सदस्य निवडले जातात. पंचायत समितीसाठीचा मतदारसंघ हा जिल्हा परिषदेसाठीच्या मतदारसंघापेक्षा अर्ध्याने लहान असतो. जिल्हा परिषदेसाठीच्या एका मतदारसंघाचे दोन समान भागात विभाजन केले की पंचायत समितीचे दोन मतदारसंघ निर्माण होतात.

**३) जिल्हा परिषद:**

त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेत सर्वात वरच्या स्तरावर जिल्हा परिषद आहे. जिल्हा हा विकासाचा केंद्रबिंदू मानला जातो.

वैधानिक दृष्टीने जिल्हा परिषदेला निगम असा दर्जा लाभला आहे. निगम हा दर्जा प्राप्त झाल्यामुळे जिल्हा परिषदेला स्वत:ची संपत्ती ठेवणे, तिचा व्यय करणे, त्यापारी करार करणे इत्यादी अधिकार असतात.

**जिल्हा परिषदेची रचना**

१९९० मधील विधिनियमातील दुरूस्तीनुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषदेची निर्वाचित सदस्यसंख्या किमान ५० आणि कमाल ७५ करण्यात आली आहे. राज्य जिल्हा परिषदेचे समान मतदारसंघ तयार ३५००० लोकसंख्येचा असतो. प्रत्येक मतदारसंघातून एका जिल्हा परिषद सदस्यांची निवड केली जाते.

**४)ग्रामसभा**

ग्रामसभा हा ग्रामपंचायत या स्थानिक स्वशासन संस्थेचाच एक भाग आहे. परंतु पंचायतराज व्यवस्थेत विशेषत: ७३वी घटनादुरूस्ती अंमलात आल्यापासून ग्रामसभेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.

**ग्रामसभेची रचना**

महाराष्ट्रात १९५८ च्या ग्रामपंचायत कायदयानुसार ग्रामसभांना मान्यता देण्यात आली होती. परंतु १९९२ साली झालेल्या ७३ व्या घटनादुरूस्तीने तिला संवैधानिक दर्जा मिळाला. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सभासद असतात. गावातील १८ वर्षे पूर्ण करणारा प्रत्येक मतदार हा ग्रामसभेचा आपोआप सभासद होतो. ग्रामसभेला निवडणूक नसते.

**नागरी स्थानिक स्वशासन**

**प्रस्तावना:**

शहर व नगर ही संकल्पना भारतासाठी नवीन नाही. प्राचीन काळातही नगरे होती. सर्वात प्राचीन समजल्या जाणा–या सिंधू संस्कृतीतील मोहोंजोदडो व हडप्पा येथे झालेल्या उत्खननातील अवशेषांवरून मौर्य काळातील नगररचना व नगरप्रशासन उत्तम प्रतीचे होते. हे दिसून येते. मौर्य काळात नगरांचा कारभर चालविण्यासाठी ३० सदस्याचे एक मंडळ असे. या मंडळांतर्गत पाच सदस्यीय सहा समित्या होत्या.

मोगल सम्राटच्या काळात नगर प्रशासनाची जबाबदारी कोतवाल या अधिका–यांकडे सोपविण्यात आली होती. मोगल सम्राटांनी सत्ता केंद्रीकरणाचे धोरण स्विकारणे होते. यामुळे नगरांमधील लोकप्रतिनिधीक स्थानिक नगरांमधील लोकप्रतिनिधीक स्थानिक स्वशासन संस्थाकडे मोगल सम्राटांचे दुर्लक्ष झाले.

**१)नगर पंचायत**

नगर पंचायतीची स्थापना संक्रमणशील क्षेत्रासाठी करण्यात येते जो भाग पूर्णत: ग्रामीण नाही. आणि पूर्णत: शहरीही नाही. म्हणजे असा भाग की जो ग्रामीणते कडून शहरी क्षेत्राकडे वाटचाल करीत आहे. नागरी क्षेत्रात रूपांतरित होत असलेल्या भागास संक्रमणशील क्षेत्र असे म्हणतात.

**नगर पंचायतीची रचना**

नगर पंचायतीची एकूण सदस्य संख्या त्या क्षेत्रातील एकूण लोकसंख्याया आधारावर राज्य सरकारद्वारे निश्चित केली जाते. साधारणत: नगर पंचायतीत ९ ते २० या दरम्यान सदस्यसंख्या असते.

**२)नगर परिषद**

लहान आकाराच्या नागरी क्षेत्रासाठी नगर परिषद स्थापन केली जाते इ.स. १९९४ पूर्वी म्हणजे ७४ वी घटना दुरूस्ती होण्यापूर्वी 'नगरपालिका' असे संबोधिले जात असे. परंतु आता नगरपालिका या नावाऐवजी नगर परिषद हे नाव निश्चित करण्यात आले आहे.

**नगर परिषदेची रचना :**

नगर परिषद ही एक लोकप्रतिनिधिक संस्था आहे. नगर परिषदेच्या निर्वाचित सदस्यांना 'नगरसेवक' असे म्हणतात.

१. 'अ' वर्ग नगर परिषदेत किमान ३८ व कमाल ६५ सभासद असतात. एक लाखानंतर पुढील प्रत्येक आठ हजार लोकसंख्येसाठी एक नवीन सभासद निवडला जातो.

२. 'ब' वर्ग नगर परिषदेत किमान २३ व कमाल ३८ सभासद असताात. चालीस हजारानंतर पुढील प्रत्येक पाच हजार लोकसंख्येसाठी एक नवीन सभासद निवडला जातो.

३. 'क' वर्ग नगर परिषदेत किमान १७ व कमाल २३ सभासद असतात. पंचवीस हजारानंतर पुढली प्रत्येक तीन हजार लोकसंख्येसाठी एक नवीन सभासद निवडला जातो.

**३) महानगरपालिका**

राज्यात महानपालिका स्थापन करण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे. प्रत्येक महानगरपालिकेची सीमा निश्चित करण्याचा तसेच महानगरपालिकेच्या सीमांमध्ये फेरबदल करण्याचा अधिकार देखील राज्यशासनालाच आहे. केंद्रशासित प्रदेशात महानगरपालिकेची स्थापना करण्याचा अधिकार संसदेला असतो.

**महानगरपालिकेची रचना**

ज्या कायदयानुसार महानगरपालिका स्थापना केली जाते. त्याच कायदयात महानगरपालिकेच्या रचनेसंबधी उल्लेख आढळतो ७४ व्या घटनादुरूस्तीनंतर महाराष्ट्र राज्याने महानगरपालिका कायदयात रचनेबाबत सुधारणा केलेली आहे.

महानगरपालिका सभासदांनी एकूण संख्या त्या—त्या महानगराच्या एकूण लोकसंख्येवर अवलंबून असते.

**४)छावणी मंडळ**

छावणी मंडळ हा नागरी स्थानिक स्वशासन संस्थांचाच एक प्रकार आहे. ज्या ठिकाणी भारतीय सैन्यदलातील सैनिकांची कायम स्वरूपाची छावणी असते. अशा ठिकाणी त्या क्षेत्रात निवास करणारे सैनिक आणि त्याच क्षेत्रात राहणारे अन्य लोक यांना नागरी स्वरूपाच्या मूलभूत सेवासुविधा पुरविण्यासाठी केली जाते. तिला छावणी मंडळ किंवा कटक मंडळ असे म्हाणतात.

**छावणी मंडळाची स्थापना**

ब्रिटिशांनी इ.स. १९२४ मध्ये कॅन्टोन्मेंट ॲक्ट पास करून छावणी मंडळांची स्थापना केली. भारतात आजही छावणी मंडळांचे कामकाज याच कायदयानुसार चालते. स्वावंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने इ.स. १९५३ मध्ये 'छावणी मंडळ' या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आढावा घेण्यासाठी श्री. एस.के. पाटील समिती स्थापन केली . या समितीने आपल्या शिफारस अहवालात

छावणी मंडळाची पुनर्रचना करून नागरी प्रतिनिधींची संख्या वाढविण्यासंबंधी शिफारस केली.

**संदर्भ :**

डॉ.प्रदीप नागोराव आगलावे—गामीण आणि नागरी समाजशास्त्र ,साईनाथ प्रकाशन नागरी समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर —२००२

रा. ज. लोटे—भारतीय स्थानिक स्वशासन, प्रकाशक पिंपळापुरे २०१४

प्रा. शेख हाशम. डॉ. जोगेंद्र गवई—तुलनात्मक शासन आणि राजकारण, प्रकाशक द.वि. भालेराव, २००४